द महाराष्ट्र
स्टेट केमिस्टस् अ‍ॅन्ड
ड्रगिस्टस् असोशिएशन
THE MAHARASHTRA
STATE CHEMISTS &
DRUGGISTS ASSOCIATION
SERVICE & SECURITY TO PATRONS
MSCDA
Opp. Jaigopal Industrial Estate,
Baburao Parulekar Marg,
Dadar (W.R.), Mumbai - 400 028.
Phone : 2431 0043, 2431 0017
Fax : 022 - 2431 0114
e-mail : mscda@vsnl.com
Affiliated to : (AIOCD)
All India Organisation of Chemists & Drugists.

संदर्भ :एफडीए/एमएमसीडीए/४९६/२०१२ २२ जुन २०१२

श्री. महेशजी झगडे
आयुक्त - अन्न व औषध प्रशासन (म.राज्य)
सर्वे न. ३४१, बांद्रे (पूर्व)
मुंबई -४०० ०५१

विषय : औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याअंतर्गत नियम १९४५चे सक्तीने पालन करणेबाबत

माननीय महोदय,

द महाराष्ट्र राज्य केमिस्ट अ‍ॅन्ड ड्रगिस्ट असोसिएशन ही गेल्या ४० वर्षापासून औषधी व्यावसायिकांचे प्रतिनिधित्व करणारी एकमेव संस्था आहे. सभासद हा व्यवसाय औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याअंतर्गत नियम १९४५चे अंतर्गतच करती. कायद्याचे पालन करत असताना अनेकदा समोर असलेला रुग्ण व कायदा यापैकी रुग्णाची गरज महत्वाची वाटते. राज्यामध्ये वर्गीकृत अ‍ॅलोपॅथीक औषधे लिहिण्यास सक्षम असणाऱ्या डॉक्टरांचा मोठ्या प्रमाणात तुटवडा असल्याचे दिसून येते.

यापरिस्थितीत सामान्य गरीब रुग्णाना औषधीपासून वंचित राहावे लागेल व त्यामुळे कदाचित जीवहानी होण्याची संभावना टाळू शकत नाही. अशा प्रसंगी सर्वतोपरी जबाबदारी प्रशासनावर राहिल याची आपण कृपया नोंद घ्यावी. प्रसंगी जनसामान्यांकडून त्या परिसरातील केमिस्ट बांधवांवर हल्ला केला जाण्याची शक्यता ही नाकारता येत नाही. याकरिता केमिस्ट बांधवास सुरक्षा ही प्रदान करण्यात यावी हि विनंती.

अन्न व औषध प्रशासन कायद्याचा बाऊ करुन राज्यामध्ये एक प्रकारे घबराहटीचे वातावरण निर्माण करित आहात. त्यामुळे औषध विक्रेत्यांमध्ये फार मोठ्या प्रमाणात गोंधळ व असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून सभासदांचा यात हस्तक्षेप करण्यासाठी राज्य संघटनेवर दबाव निर्माण होत आहे. त्यांच्या भावनांचा उद्रेक होऊ नये यासाठी राज्यसंघटनेने यामध्ये हस्तक्षेप करुन कायद्याचे पालन करित व्यवसाय करता यावा या दृष्टिने खालील निर्णय घेण्याचे ठरविले आहे.

१. राज्यभर औषधी दुकाने सकाळी १०.०० ते सायं. ६.००वा. या कालावधीत उघडी राहतील.
२. वर्गीकृत औषधांची विक्री फक्त वर्गीकृत औषधे लिहण्यास सक्षम असणाऱ्या डॉक्टरांच्या चिठ्ठीवरच दिली जातील.
३. वर्गीकृत औषधांची विक्री कुठल्याही कारणाने कांऊटरवर केली जाणार नाही.

वरील प्रकारे महाराष्ट्रातील सर्व औषध विक्रेते व्यवसाय करतील. राज्यसंघटनेच्या दिनांक ८ जुलै २०१२ रोजी होणाऱ्या कार्यकारिणी सभेमध्ये याबाबतची पुढील दिशा निश्चित करण्यात येईल. यामुळे राज्यामधील आरोग्य सेवा विस्कळित होऊन प्रसंगी जनप्रक्षोभ निर्माण झाल्यास त्यास शासन व प्रशासन जबाबदार राहील. यांची नोंद घ्यावी.

कळावे..

आपला नम्र
दि महाराष्ट्र राज्य केमिस्ट अ‍ॅन्ड ड्रगिस्ट असोसिएशन

अनिल नावंदर
सचिव

P. A. to Commissioner
F... Administration
(... State), Mumbai

प्रतिलिपी - सर्व सह आयुक्त तथा सहायक आयुक्त जिल्हा प्रशासन यांना माहिती करिता सादर